प्रेसनोट                                                        दिनांक –०३/०४/२०२३

**लोकसेवक श्री. महेशकुमार जनार्दन कचरे वय ४६ वर्षे तलाठी,सजा अल्याळी ,ता.जि.पालघर (वर्ग ३) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांनी घेतले ताब्यात**

| | | |
|---|---|---|
| १ | **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर |
| २ | **गुन्हा नोंद कमांक** | पालघर पोलीस ठाणे, ता. पालघर जि. पालघर |
| ३ | **कलम** | भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| ४ | **लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | **लोकसेवक श्री. महेशकुमार जनार्दन कचरे वय ४६ वर्षे तलाठी,सजा अल्याळी ,ता.जि.पालघर (वर्ग ३)** |
| ५ | **मागितलेल्या लाचेची रक्कम** | १५,०००/–रुपये. |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | १०,०००/– रुपये |
| ७ | **थोडक्यात हकिगत** | यातील तक्रारदार यांनी मौजे चहाडे, ता. जि. पालघर येथे श्री. विजय पाटील यांचेकडुन सर्व्हे नं. १९६/१/अे/१ मध्ये २७ गुंठे जमिन विकीपत्राप्रमाणे विकत घेतलेली आहे. नमुद जमिन फेरफार नोंदीसाठी तक्रारदार यांनी तलाठी सजा चहाटे श्री. महेशकुमार कचरे यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांना अर्ज देण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी माहे फेब्रुवारी अर्ज पाठविला. परंतु तलाठी सजा चहाटे श्री. महेशकुमार कचरे हे तक्रारदार यांचे जमिनीचे महसुल अभिलेखात फेरफार नोंद घेण्याचे मुददाम टाळुन वारंवार तक्रारदार यांना फोन करून कामाचा मोबदला दिल्या शिवाय तुमचे काम होणार नाही असे म्हणुन लाचेची मांगणी करित होते. त्यामुळे तक्रारदार यांनी दिनांक २९/०३/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषगाने दि. २९/०३/२०२३ रोजी तक्रारदार यांना आलोसे यांना भेटण्यासाठी पंचासह पाठवून पडताळणी केली असता आलोसे हे लाचेची मांगणी करित असल्याचे निष्पन्न झाले. दि. ३/४/२०२३ रोजी आलोसे यांनी स्वत:चे पदाचा व अधिकाराचा दुरूपयोग करून तक्रारदाराने खरेदी केलेल्या जमिनीचे फेरफार ची महसूल अभिलेखात नोंद करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे १५,०००/– रूपये स्वत:साठी लाचेची मागणी करून १०,०००/– रुपये लाच स्वीकारुन ला.प्र.वि. ची चाहूल लागताच पळुन जात असताना पाठलाग करुन आलोसे यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर प. ४०१ ४०४.

संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com

ऑनलाईन तक्रार :– ––

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री नं. :– 1064

दुरध्वनी कमांक :– 02525-297297

व्हॉट्स ॲप क. :– 9923346810


पोलीस उप अधीक्षक ... लाचलुचपत प्रतिबंधक ब्युरो, ठाणे (जिल्हा पालघर)

(स्वपन बिश्वास)
पोलीस निरिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर